Vol 3 Issue 10 Nov 2013

ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# Indian Streams Research Journal

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.


## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra


**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume-3, Issue-10, Nov-2013
ISSN 2230-7850

Available online at www.isrj.net

# *समर्थ रामदासांचे समाजविषयक चिंतन*

*संध्या संजय पावटे*
संशोधन विद्यार्थिनी, मराठी विभाग,कर्नाटक विद्यापीठ, धारवाड

***सारांश :*** सुरुवातीच्या काळात समर्थांचे विचार इतर संन्याशांच्या विचाराशी मिळते जुळते होते. संसार मिथ्या आहे, देह नश्वर आहे असे त्यांचे निवृत्तीवादी विचार होते. याच निराशावादाची जबरदस्त छाया आख्या हिंदुस्थानावर पसरलेली त्यांनी त्यांच्या भारतभ्रमणात पाहिली व त्याचे परिणाम ही पाहिले. त्यामुळे त्यांच्या विचारात फरक पडला. वेदकालीन विचारांच्या त्यांनी पुरस्कार केला. मरगळलेल्या समाजाला त्यांनी समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अध्यात्मकारण या व्यक्तीधर्माच्या चतु:सूत्रीचा अंगीकार करायला लावला. सामर्थ्य आणि युक्ती, प्रपंच आणि आध्यात्म याचा समन्वय साधला. समाजाला कृतिप्रवण बनवले व क्रांती घडवून आणली. त्यामुळे त्यांना संत न म्हणता समर्थच म्हटले पाहिजे.' भक्ती करा पण ती लपून छपून करू नका. निर्भयतेने करा असा त्यांचा संदेश होता भक्त संन्याशाचा योध्दा संन्याशी झाला.

***प्रस्तावना :***

पुष्कळ जणांचा असा आक्षेप आहे की, समर्थ हे ब्राम्हणांचे वर्गाचे पुढारी होते पण हा समज चुकीचा आहे. ब्राम्हण वर्णाचा त्यांनी पुरस्कार केला.

त्यांना अभिप्रेत असलेला ब्राम्हण वर्ण हा वेगळाच होता.
ब्राम्हणु ब्रम्हवेत्ता तो । ब्राम्हणु ब्रम्हनिश्चयही
ब्राम्हणु ब्रम्हस्थितीचा । ब्राम्हणु म्हणिजे गती [1]। '

ज्याने ब्रम्ह जाणले ज्याला ब्रम्हाचा निश्चय झाला तो ब्रम्हच होऊन गेला अशा ब्राम्हणांवाचून जगाचे अडते ब्राम्हण म्हणजे जगातील गती होय ।

करिती ब्रम्हनिरूपण । जाणती ब्रम्ह संपूर्ण
ते चि जाणावे ब्राम्हण। ब्रम्हविद[2] '

जे ब्रम्हाचे संपूर्ण स्वरूप जाणतात व ब्रम्हाचे लोकोद्वारार्थ निरूपण करतात ते ब्रम्हवेत्ते ब्राम्हण होत.

ब्राम्हणत्वस्य ही रक्षणे रक्षितः स्याद्वैदिको धर्म
तद्धनित्वा द्वर्णाश्रम भेदानाम् शंकराचार्य

चारही वर्ण व चारही आश्रम हे ब्राम्हणाधीन असल्यामुळे ब्राम्हणांचे रक्षण हे वैदिक धर्माचे रक्षण मानले जात असे.

वेदकाळात ब्राम्हण्वर्ण हा जन्मावर अवलंबून नसून कर्मावर अवलंबून होता. ब्राम्हणांचे आचरण हे अतिशय कडक नियमांच्या बंधनात असे. जप, तपा, पूजा अर्चा, यज्ञयाग इत्यादी संस्कार त्यांच्यावर झालेले असत. वयाच्या आठव्या वर्शीच गुरूकुलात त्यांना दाखल व्हावे लागे व संपूर्ण जीवन हे कउक शिस्तीतच घालवावे लागे. त्यामुळे विद्वत्ता असणे, आचरणावर बंधन असणे शरणागत भाव असल्याशिवाय ब्राम्हण बनणे शक्यच नव्हते. महत्वाची गोश्ट अशी की ऋशी व मुनी हेही ब्राम्हणच होत पण त्यांचा क्षत्रियावर म्हणजे सत्ताधा—यांवर अंकुश असे जेणे करून राज्यशासन हे न्याय व सचोटीवर चालत असे.

दुसरी गोष्ट म्हणजे ब्राम्हण हे आचरणासाठी, क्षत्रिय हे रक्षणासाठी, वैश्य हे धनासाठी, व शूद्र हे शेतकीची कामे करण्यासाठी असत. त्यामुळे समाजाची उत्पादनशीलता किंवा उत्पादन क्षमता ही खरे तर वैश्य व शूद्र यांच्यावरच अवलंबून होती पण ब्राम्हण असणे हे एक मानाचे स्थान मानले जात असे त्यामुळे कोणालाही निवड करण्यास दिली तर त्याने ब्राम्हण वर्णाचीच निवड केली असती व पर्यायाने समाजातील ब्राम्हणांची संख्या वाढून सामाजिक उत्पादन क्षमता कमी झाली असती व हे टाळण्यासाठीच ब्राम्हणांवर कडक बंधने होती. त्यामुळे विरक्त व कर्तबगार माणसेच ब्राम्हण वर्णाचा स्वीकार करीत असत व त्यांच्यांकडे समाजाचे नेतृत्व असे. पण पुढे जन्मावरून वर्ण ठरू लागला व ब्राम्हण वर्ण नाही, ब्राम्हण ही एक जात बनली व अशा प्रकारे वर्णव्यवस्था विस्कळीत झाली.

समर्थांच्या काळात कर्मठ ब्राम्हणांनी कर्मकांडाना महत्व देऊन इतर जातींना हीन लेखले, तर काही आचारभ्रष्ट झाले. ब्रम्हज्ञानाचा विचार ब्राम्हणास आहे पण ते आपले गुरूत्व सोडून शिश्यांचे शिष्य झाले, समर्थांनी पाहिले की —

ब्रम्हज्ञानाचा विचार । त्याचा ब्राम्हणाशीच अधिक
वर्णाच्या ब्राम्हणो गुरू । ऐसे वचन ।। 30 [3]।।'

त्यातून यवनांच्या आक्रमणामुळे इहलोक ना परलोक अशी त्यांची अवस्था झाली कित्येक जण परक्य मुलुखांस गेले कित्येक पीराला भर लागले, कोणी मुसलमान झाले. म्लेच्छांच्या हाती राज्य गेले व हीन यातींचे प्रभुत्व आले.

समर्थाचा ब्राम्हणवर्गाच्या आचरणावर मोठा कटाक्ष असे. हजारो वर्शाची परंपरा व संस्कृती यांचा विचार केला तर असे वाटते की वैराग्य हे ब्राम्हणवर्णाच्या रक्तातच असावे. एक ब्राम्हणवर्ण सुस्थितीत असला तर बाकी तीनही वर्ण व्यवस्थित राहतील कारण या तीनही वर्णांचे नेतृत्व ब्राम्हण वर्णाकडेच होते. ब्राम्हण वर्णाबद्दल आदर व्यक्त करतांना ते म्हणतात —

देव ब्राम्हणी सत्ता करी । तो एक मूर्ख ।। 68 [4] ।।'

ब्राम्हण हे यवनांचे मुख्य लक्ष्य होते. मूर्तिपूजक, शाकाहारी हिंदु समाजाचे नेतृत्व करणा—या ब्राम्हणांचा नायनाट तरी करावा किंवा त्यांना मुसलमान बनवावे जेणेकरून इतर जातींना नेतृत्व उरणार नाही व सर्व जनमानसावर यावनी सत्ता प्रस्थापित होईल असा त्यांचा उद्देश होता व समर्थाचा ब्राम्हणवर्णावर भर होता. त्यांनी समाज संघटनेसाठी ब्राम्हण जाती विरुध्द आचरण केले आहे. श्री संप्रदायाची कागदपत्रे यात लेखांक 52 मध्ये विठ्ठल गोसावी यांनी दिवाकर गोसावी यांना पत्र लिहिले आहे. 1596 मध्ये चाफळच्या राममंदिरात नवस फेडला व समर्थांनी शिंगणवाडी येथे शूद्र जातीचे भोजन घडवून आणले त्याच वर्षी रायगडावर राज्याभिशेक सोहळा झाला. रूढीप्रमाणे रायगडावर ब्राम्हणभोजन झाली पण समाजातील रूढीवादी प्रवृत्तींना धुडकावून त्यांनी शूद्रांचे भोजन घडवून आणले.

ऐसे कैसे रे सोवळे । शिवता होतसे ओवळे असा त्यांनी उपहास केला आहे [5] । '
शिरवळ येथील मठावर बाजी गोसावी व पारगावच्या मठावर शंकराजी गोसावी या शूद्र जातीतल्या लोकांची त्यांनी महंत म्हणून नेमणूक केली होती[6]. '

समर्थाना ब्राम्हण जातीचे वर्चस्व प्रस्थापित करावयाचे नव्हते तर पुरोहितशाही, ग्रामण्य, नीच सेवा, कर्मकांड यात गुरफटलेल्या ब्राम्हणवर्गाला समाजसेवा, लोकसंग्रह, राष्ट्रकारण, सांस्कृतिक गुरूत्व व निस्पृह समाजकार्य यांत गुतवायचे होते. ब्राम्हतेज व क्षात्रतेजाचे त्यांना समाजसेवा व समाजरक्षण करण्यासाठी उपयोग करायचा होता.

***समर्थ व मुस्लीम धर्म :—***

समर्थ हे मुसलमानांविरुध्द कधीच नव्हते त्यांचे शत्रुत्व होते. ते यावनी सत्तेशी, धर्मवेडेपणाशी व त्यांच्या अत्याचारी वृत्तीशी मुसलमानांनाही त्यांनी आपल्या धर्माची ओळख करून दिली होती, मुसलमानांनी जसा निर्गुणवादाचा पुरस्कार केला तसा समर्थांनाही केला. त्यांनी मुसलमांनी अष्टकही लिहिले आहे.

गिरीधर स्वामींनी त्यांची काही पदे लिहीली आहेत व त्यात 'कहते किताब कुराना' असे त्यांनी लिहीले आहेत.

सगळया धर्मांनी सुखाने नांदावे एक जमीन एक आका मग कशाला एकमेकांशी भांडायचे व लढायचे ? असा त्यांचा मुसलमांनाना सवाल होता.[7]

वेदकालाला अनुसरून समाजाचे बौध्दिक नेतृत्व करण्याची जबाबदारी ब्राम्हण वर्णाची होती. पण ब्राम्हण हे सत्वापासून व स्वधर्माच्या आचरणापासून कसे ढळले होते याचे अस्वस्थ करून सोडणारे चित्रण करण्यास समर्थ विसरले नाहीत. ज्यांनी ज्ञानसाधना करावी आणि स्वतःचा आत्मविकास घडवून इतर जनांना आत्मविकासाचा मार्ग दाखवावा.

त्या ब्राम्हणांसाठी समर्थांनी आचारसंहिता तयार केली व ही आचारसंहिता कोणत्याही काळात बौध्दिक नेतृत्व करणा—या दृष्टीने महत्वाची आहे. स्नानसंध्यादि कर्मे वैश्वदेव उपासना त्या व्यक्तीच्या जीवनातील शिस्त व शुचिर्भूतता व्यक्त करते. वेद शास्त्रांचा अभ्यास पुरश्चरण आणि ध्यान या त्यांच्या बौध्दिक व मानसिक सामर्थ्यात भर घालते. काव्याचा, पुराणांचा अभ्यास आणि त्याचे निरूपण स्वतःच्या व इतरांच्या ज्ञानात भर घालते. उपासना व कर्म यांचे आचरण केल्याने ब्रम्हज्ञान प्राप्तीसाठी आवश्यक अशी धारणा निर्माण होते. ब्रम्हज्ञानानंतरही भक्ती आणि ज्ञान यांच्या योगाने अखंड वैराग्य अनुभवाला येते.

ब्राम्हण म्हणजे कोण ?ब्रम्हवेत्ता । ब्रम्हनिश्चयी व ब्रम्हस्थितींचा अनुभव घेणारा तो ब्राम्हण. या ब्राम्हणाच्या योगाने सामाजिक जीवनाला एक प्रकारची गती प्राप्त असते. सू—सर या धातूपासून जीवनातील गती या तत्वाची अधिश्ठात्री सरस्वती ही देवता कल्पना उदयास आली, जिथे गती आहे तिथेच निर्मिती आहे अशा सरस्वतीची उपासना करून ब्रम्हस्थिती अनुभवणारा तो ब्राम्हण. अशी ब्राम्हणांची समर्थांनी केलेली व्याख्या जातिनिश्ठ म्हणता येईल का ?'8

समर्थावर ब्राम्हणांचे पुढारी म्हणून सतत टीका केली जाते हे टीकाकारांचे अज्ञानच म्हणावयाचे. कारण ब्राम्हण ही जात आहे आणि ब्राम्हण्य हे संस्कृतीचे अंग आहे व यातील भेद टीकाकारांना उलगडलेला नाही.

शमो दमस्तपः शौचं संन्तोशः क्षान्तिरार्जवम्  
मद्भक्तिश्च दया सत्यं ब्रम्हप्रकृतयस्त्विमाः  
अशी दशलक्षणयुक्त ब्राम्हणप्रकृती म्हणजे —

शम म्हणजे सर्वकाळ माझे अनुसंधान, दम म्हणजे बाह्योंद्रियनिग्रह, तप म्हणजे आत्मस्वरूपाची नित्य विवंचना वैदिक विचारांनी व अंतरीची आत्मनिश्ठा शुध्दीसाठी आवश्यक आहे. संतोश म्हणजे संपत्तीच्या अगर विपत्तीच्या वेळची समता, क्षांती म्हणजे मनात कसल्याही प्रकारचे विकार उत्पन्न होऊ न देणे. सर्वत्र भूतमात्राांचे ठिकाणी ऋजुतत्व, अनन्यभावे माझे ठिकाणी प्रेम, दया म्हणजे दीनाकरता सर्वस्व अर्पण करणे, सत्य म्हणजे कायावाचामनाने ईशस्वरूप पाहाणे होय. अशा दहा लक्षणांनी युक्त तो ब्राम्हण मग त्याचा वर्ण वा जात कोणतीही असो. सत्व गुणांनी युक्त तो ब्राम्हणच, नामदेव, तुकाराम आदि संत ब्राम्हणेत्तर जातीत जन्माला आलेले संत समर्थांना वंदनीय होते.[9]

मठांमध्ये त्याकाळी कीर्तन—प्रवचन—भजन इतर कार्यक्रम चालत असत. सर्वसमावेशक भजनांची व्याख्या करताना त्यांनी म्हटले आहे.  
भेटो कोणी येक नर । धेड महार चांभार  
त्याचे राखारे अंतर या नाम भजन ।।

जन्माने ब्राम्हण असून ज्यांच्या ठिकाणी ब्राम्हण्य नाही त्यांच्या बद्दल समर्थांनी कठोर शब्द उच्चारले आहेत. ऐसे कैसे रे सोवळे । शिवता होतसे ओवळे असा सवाल त्यांनी केला. समाजाचे सत्व राखताना ब्राम्हण ही वृत्ती असलेल्या ब्राम्हणमंडळया मेळावाव्या असे समर्थ म्हणतात.

***संदर्भ सूची :—***

1.स्फुट प्रकरणे 16,17  
2.दासबोध 6 : 4 : 24  
3.दासबोध 14 : 7 : 27पृ—674  
4.दासबोध 2 : 1 : 68 पृ—55  
5.स्फुट प्रकरण (17:1)  
6.समर्थ संप्रदाय लेखक श्री गोसावी— पृ 16  
7.श्री समर्थ हृदय लेखक श्री देवल पृ—532  
8.श्री समर्थ सपंद्राय लेखक श्री रा.गा. गोसावी पृ—42  
9.समर्थ रामदासांचा भक्तीयोग लेखक श्री अभ्यंकर पृ—257

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

* International Scientific Journal Consortium Scientific
* OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

* Google Scholar
* EBSCO
* DOAJ
* Index Copernicus
* Publication Index
* Academic Journal Database
* Contemporary Research Index
* Academic Paper Databse
* Digital Journals Database
* Current Index to Scholarly Journals
* Elite Scientific Journal Archive
* Directory Of Academic Resources
* Scholar Journal Index
* Recent Science Index
* Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net